मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# विधानसभा उपाध्यक्ष बनसोडे यांचा अवमान?

## विविध संस्था-संघटनांकडून आज मोर्चा : महापालिका आयुक्तांचा निषेध

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा प्रारूप विकास आराखडा रद्द करावा, या मागणीसाठी मागील आठवड्यात काढण्यात आलेल्या मोर्चात विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे सहभागी झाले होते.

राजशिष्टाचारानुसार या मोर्चाला सामोरे जाण्याची नैतिक जबाबदारी आयुक्त शेखर सिंह यांची होती. परंतु आयुक्त सिंह अथवा अतिरिक्त आयुक्त देखील या मोर्चाला सामोरे गेले नाहीत. आयुक्तांची ही वर्तणूक राजशिष्टाचार पायदळी तुडवणारी आहे, तसेच आण्णा बनसोडे हे अनुसूचित जाती, जमाती समाजाचे प्रतिनिधी असल्यामुळे आयुक्तांनी मोर्चाला सामोरे जाण्याचे टाळले याचा निषेध करण्यासाठी आणि आयुक्त शेखर सिंह यांच्या हकालपट्टीची मागणी करण्यासाठी दलित अत्याचार प्रतिबंधक कृती समिती, पिंपरी चिंचवडच्या वतीने सोमवारी (दि. ११ ऑगस्ट) सकाळी ११ वाजता, पिंपरी येथील राजमाता अहिल्यादेवी होळकर पुतळा येथून मोर्चा काढण्यात येणार आहे. यानंतर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर निषेध सभा आयोजित करण्यात आली आहे.



रविवारी पिंपरी चिंचवड येथे शिव, फुले, शाहू, आंबेडकर चळवळीत काम करणाऱ्या प्रतिनिधींची व दलित अत्याचार प्रतिबंधक कृती समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

> आयुक्त शेखर सिंह यांचे हे कृत्य भारतीय संविधानाच्या कलम १४ (समता), कलम १५ (जातीच्या आधारावर भेदभाव प्रतिबंध) आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा, १९८९ अंतर्गत दंडनीय अपराध असून, आयुक्तांच्या जातीवादी मानसिकतेचे स्पष्ट द्योतक आहे अशी भावना पिंपरी चिंचवड शहरात आंबेडकरी चळवळीत कार्य करणाऱ्या जनतेमध्ये निर्माण झाली आहे.
>
> **- बाबा कांबळे,**
> **कष्टकरी कामगारांचे नेते.**

या बैठकीमध्ये रिपब्लिकन नेते सुरेश निकाळजे, कष्टकऱ्यांच्या नेते बाबा कांबळे, रिपब्लिकन नेते राहुल डंबाळे, बाळासाहेब रोकडे, संतोष निसर्गंद, कुणाल वाव्हळकर, अजीज शेख, गोपाल तंतरपाळे, प्रमोद क्षीरसागर, सिकंदर सूर्यवंशी, अजय झुंबरे, योगेश भोसले, संजय शर्मा, रवींद्र ओव्हाळ, यश बोध, गंगा ताई धेंडे, बळीराम काकडे, रमेश शिंदे, संतोष वाघमारे, चंद्रकांत बोचकुरे, प्रवीण वाघमारे, ॲड. नीलध्वज माने, पंकज वाघमारे, नजीर मुलाणी आदी या बैठकीमध्ये उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड शहरातील बहुजन मागासवर्गीय आणि कष्टकरी जनता अण्णा बनसोडे यांच्या अपमानाचा तीव्र निषेध करते. या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी आणि आयुक्त शेखर सिंह यांची हकालपट्टी करून कडक कारवाई करावी या मागणीसाठी या मोर्चा सहभागी व्हावे असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

---

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत आता अभिजात मराठी भाषा सप्ताह

## मराठी भाषेच्या जतन व संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या संस्था व संघटनांसोबत होणार संवाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या निर्देशानुसार ३ ऑक्टोबर हा दिवस 'अभिजात मराठी भाषा दिन' तर ३ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' साजरा केला जाणार आहे. या काळात पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व संवर्धन करणारे विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन आहे.

त्या अनुषंगाने विचारविनिमय करण्यासाठी, मराठी भाषेच्या जतन व संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या संस्था व संघटनांचे पदाधिकारी, प्रतिनिधी यांच्यासमवेत अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अध्यक्षतेखाली उद्या सोमवारी, ११ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता बैठक आयोजित केली आहे.




महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील तिसऱ्या मजल्यावरील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात ही बैठक होईल, अशी माहिती महापालिकेचे विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांनी दिली आहे.

'अभिजात मराठी भाषा दिन' आणि 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' काळात, महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अभिजात मराठी भाषा संदर्भात तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने, चर्चासत्रे, परिसंवाद, कार्यशाळा, शिबिरे यांचे आयोजन, अभिजात मराठी भाषा ग्रंथ परंपरेची विद्यार्थी व सामान्य जनतेला ओळख करून देण्यासाठी मराठी ग्रंथ व साहित्यांचे प्रदर्शन, अभिजात मराठी भाषेतील प्राचीन ग्रंथ संपदेचे समकालीन मराठीत अनुवाद केलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन व विक्री, शाळा व महाविद्यालयांमध्ये मराठी भाषेसंदर्भात प्रश्नमंजुषा, निबंधलेखन, वकृत्व स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन, तसेच अभिजात मराठी भाषेशी संबंधित इतर नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे पिंपरी चिंचवड महापालिकेचे नियोजन आहे.

यावर सविस्तर विचारविनमय ११ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित बैठकीत करण्यात येणार आहे. तरी मराठी भाषेच्या जतन व संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या संघटनांचे पदाधिकारी, प्रतिनिधी, साहित्यिक तसेच मराठीप्रेमी नागरिकांनी बैठकीला उपस्थित राहावे, असे आवाहन महापालिकेचे विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांनी केले आहे.

# शुल्क आकारणीबाबत ‘एफआरए’चा इशारा!

## विद्यार्थी, पालकांच्या तक्रारी आल्यास कारवाई करणार : वेगवेगळ्या नावाखाली नफेखोरी नको

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील खासगी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना वेगवेगळ्या नावांखाली अनामत शुल्क, ठरवलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारणी करता येणार नाही. त्याबाबतचे निर्देश शुल्क नियामक प्राधिकरणाने (एफआरए) दिले असून, या बाबत विद्यार्थी, पालकांच्या तक्रारी आल्यास कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

अनामत शुल्क, शुल्क आकारणीबाबत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना एफआरएकडून वेळोवेळी स्पष्टता देण्यात आली आहे. सध्या राज्यात अभियांत्रिकी, व्यवस्थापन, हॉटेल मॅनेजमेंट, विधी अशा विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. या पार्श्वभूमीवर ‘एफआरए’चे सचिव डॉ. अर्जुन चिखले यांनी या बाबतचे परिपत्रक नुकतेच प्रसिद्ध करून शुल्क आणि अनामत शुल्क आकारणीकडे शिक्षण संस्था, महाविद्यालयांचे लक्ष वेधले आहे.



विद्यार्थ्यांकडून घेतल्या जाणाऱ्या अनामत रकमेची कमाल मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. प्राधिकरणाच्या २८ ऑगस्ट २०२४च्या बैठकीत आणि ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध झालेल्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६च्या नियमावलीत हा नियम ठरवून देण्यात आला आहे. अनामत रक्कम केवळ एकदाच आकारली जावी आणि वेगवेगळ्या नावाखाली ते वसूल करू नये. त्याचप्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर ही रक्कम संबंधित विद्यार्थ्यांना परत करणे बंधनकारक आहे. संस्था अधिनियम २०१५मधील कलम १४(५) नुसार, कोणतीही संस्था एका शैक्षणिक वर्षात एका वर्षाच्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क वसूल करू शकणार नाही, असे ‘एफआरए’ने स्पष्ट केले आहे.

अधिनियम २०१५च्या किंवा त्याखालील नियमांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास, त्या बाबत विद्यार्थी-पालकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यास कलम २०नुसार कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

### वसतिगृह, खानावळ सुविधा ऐच्छिक

**» राज्यातील अनेक शिक्षण संस्था वसतिगृह आणि खानावळीची सुविधा उपलब्ध करून देतात. मात्र, एफआरएने वसतिगृह आणि खानावळीच्या सुविधांबाबतही परिपत्रकात नमूद केले आहे. विद्यार्थ्यांना वसतिगृह आणि खानावळ सुविधा वैकल्पिक स्वरूपात उपलब्ध करून द्याव्यात. त्याबाबत विद्यार्थ्यांना सक्ती करण्यात येऊ नये, असेही एफआरएने स्पष्ट केले आहे.**

> "राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी असलेल्या खासगी महाविद्यालयांनी ठरवलेल्या शुल्कापेक्षा अधिक रक्कम कोणत्याही स्वरूपात — अनामत शुल्क, डिपॉझिट, डेव्हलपमेंट फी किंवा इतर कोणत्याही नावाखाली — विद्यार्थ्यांकडून घेऊ नये. ही रक्कम एकदाच आकारावी आणि अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर ती विद्यार्थ्यांना परत करणे बंधनकारक आहे.
> **— डॉ. अर्जुन चिखले, सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण.**

# भारताच्या संरक्षण प्रणालीच्या निर्यातीत वाढ होणार!

## भारतीय शस्त्रास्त्रांना जागतिक मंचावर वाढती मागणी; संरक्षण निर्यातीत लक्षणीय वाढीची शक्यता

**पुणे | प्रतिनिधी**

‘भारतीय बनावटीच्या शस्त्रास्त्रांना जागतिक बाजारपेठेत मोठी मागणी आहे. दक्षिण-पूर्व आशिया, आफ्रिका आणि मध्य-पूर्वेतील देश भारतीय संरक्षण प्रणालींमध्ये विशेष स्वारस्य दाखवत आहेत. त्यामुळे पुढील काही वर्षांत संरक्षण प्रणालींच्या निर्यातीत वाढ होईल,’ असा विश्वास संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे (डीआरडीओ) अध्यक्ष डॉ. समीर कामत यांनी शनिवारी व्यक्त केला. संरक्षण निर्यातीचा टप्पा सन २०२८-२९ पर्यंत ५० हजार कोटींपर्यंत नेण्याचे लक्ष ‘आत्मनिर्भर भारत’मुळे सहज साध्य होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

खडकवासला येथे ‘डिफेन्स इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स टेक्नॉलॉजी’च्या (डाएट) पदवीदान समारंभात डॉ. कामत यांच्या हस्ते ‘डाएट’च्या २९८ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ‘डायट’चे कुलगुरू डॉ. बीएचव्हीएस नारायण मूर्ती या वेळी उपस्थित होते.




कमात म्हणाले,‘देशाच्या संरक्षण निर्यात २०२४-२५ या आर्थिक वर्षात २३ हजार ६२२ कोटींपेक्षा जास्त झाली. त्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत १२.०४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. ऑपरेशन सिंदूरच्या यशामुळे जो प्रतिसाद मिळत आहे, त्यावरून येत्या दोन-तीन वर्षांत संरक्षण निर्यातीचे प्रमाण दुपटीने वाढण्याची शक्यता आहे. ‘पिनाका,’ ‘ब्राह्मोस’ आणि ‘आकाश’ क्षेपणास्त्र, स्वदेशी बनावटीची ॲडव्हान्स्ड टोव्ड आर्टिलरी गन सिस्टम (एटीएजीएस) तोफ यांना जागतिक बाजारपेठेत मोठी मागणी आहे. तसेच दक्षिण-पूर्व आशिया, आफ्रिका आणि मध्य-पूर्वेतील देश भारतीय बनावटीच्या संरक्षण प्रणालींमध्ये विशेष स्वारस्य दाखवत आहेत. त्यामुळे पुढील काही वर्षांत संरक्षण प्रणालींच्या निर्यातीत वाढ होईल.’

### ‘ऑपरेशन सिंदूर’मध्ये ‘स्वदेशी’चा वापर

**»**‘ऑपरेशन सिंदूर’मध्ये ब्राह्मोस क्षेपणास्त्र आणि आकाशतीर ही संरक्षण प्रणाली अशा स्वदेशी उत्पादनांनी निर्णायक भूमिका बजावली. सुखोई विमानातून ‘ब्राह्मोस’ डागण्यात आले, तर संरक्षणासाठी ‘आकाशतीर’ ही अँन्टी ड्रोन प्रणाली आणि मीडियम रेंज सर्फेस-टू-एअर मिसाईल यांचा वापर करण्यात आला होता. ‘ऑपरेशन सिंदूर’ हा देशाच्या संरक्षण क्षेत्रातील संशोधन आणि उत्पादनाच्या सामर्थ्याचे प्रतीक आहे, असेही समीर कामत यांनी सांगितले.

> "भारतीय बनावटीच्या शस्त्रास्त्रांना जागतिक बाजारपेठेत प्रचंड मागणी असून, 'पिनाका', 'ब्राह्मोस', 'आकाश' क्षेपणास्त्र तसेच स्वदेशी 'एटीएजीएस' तोफ यांसारख्या अत्याधुनिक संरक्षण प्रणालींमुळे भारताची निर्यात क्षमताही झपाट्याने वाढत आहे. दक्षिण-पूर्व आशिया, आफ्रिका आणि मध्य-पूर्वेतील देश भारतीय संरक्षण तंत्रज्ञानात विशेष रस दाखवत असून, आत्मनिर्भर भारत मोहिमेमुळे सन २०२८-२९ पर्यंत संरक्षण निर्यातीचा टप्पा ५० हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचणे सहज शक्य आहे."
> **— डॉ. समीर कामत, अध्यक्ष, डीआरडीओ.**

# 'सही रे सही'@4500.. प्रेक्षकांचे उदंड प्रेम!

## रंगभूमीने आशिर्वाद दिला: 23 वर्षांच्या अथक प्रवासात 4500 प्रयोगांचा यशस्वी पल्ला..!

**पिंपरी | प्रतिनिधी**

सही रे सही' नाटक २००२ मध्ये सुरू झाले, तेव्हा ते तब्बल २३ वर्षे चालेल किंवा ४५०० प्रयोगांचा यशस्वी पल्ला पार करेल, असे कधीच वाटले नव्हते. मात्र, रसिक प्रेक्षकांनी नाटकावर आणि आम्हा कलावंतांवर उदंड प्रेम केले. रंगभूमीने आशिर्वाद दिला. त्यामुळेच 'सही रे सही'ची यशस्वी घोडदौड सुरू आहे आणि यापुढेही कायम राहील, अशी भावना प्रसिध्द अभिनेते भरत जाधव यांनी चिंचवड येथे बोलताना व्यक्त केली.



केदार शिंदे लिखित आणि दिग्दर्शित तसेच भरत जाधव यांची चौरंगी भूमिका असलेल्या 'पुन्हा सही रे सही' या नाटकाचा विक्रमी ४५०० वा प्रयोग रविवारी (१० ऑगस्ट) चिंचवडच्या प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृहात पार पडला. याचे औचित्य साधून दिशा सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने नाटकाच्या यशस्वी वाटचालीबद्दल केक कापून आनंद व्यक्त करण्यात आला. याशिवाय, प्रख्यात उद्योजक विजय जगताप आणि भाजपचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या हस्ते भरत जाधव यांचा स्मृतीचिन्ह देऊन प्रातिनिधीक सत्कार करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना भरत जाधव म्हणाले की, १५ ऑगस्ट २००२ रोजी मुंबईत छत्रपती शिवाजी नाट्य मंदिरात या नाटकाचा पहिला प्रयोग झाला. त्याआधी पिंपरीतील आचार्य अत्रे रंगमंदिरात रंगीत तालीम होत होती. आजूबाजूचे नागरिक तसेच विद्यार्थ्यांना आम्ही नाटकास बसा, अशी विनंती करायचो आणि त्यांचे अभिप्राय जाणून घेत होतो. पुढे जाऊन नाटक कमालीचे हीट झाले. रंगभूमीचा आशिर्वाद मिळाला. पहिल्या खेळापासून ते आजपर्यंत प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभलेला आहे.

आता हे नाटक आमचे राहिले नसून ते पूर्णपणे रसिक प्रेक्षकांचे झाले आहे. एकच कलाकार एकाच नाटकात सलगपणे २३ वर्षे काम करतो आहे आणि या संपूर्ण कालावधीत नाटकाला प्रेक्षकांचे भरभरून प्रेम मिळते आहे, हे भाग्य मला मिळाले आहे. सही रे सहीला कायम पाठबळ देणाऱ्या पिंपरी-चिंचवडकरांच्या साक्षीने आम्ही ४५०० वा प्रयोग आणि त्यानिमित्ताने आनंद सोहळा आम्ही साजरा करत आहोत, याचा आमच्या टीमला खूपच अभिमान वाटतो आहे. प्रेक्षकांच्या निस्पृह प्रेमामुळे पाच हजार प्रयोगसंख्येच्या दिशेने 'पुन्हा सही रे सही'ची वाटचाल सुरू राहणार आहे.

यावेळी माजी नगरसेवक मोरेश्वर शेडगे, दिशा सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष बाळासाहेब जवळकर, माजी अध्यक्ष गोरख भालेकर, नाना शिवले, कार्याध्यक्ष राजेंद्र करपे, माजी कार्याध्यक्ष सचिन साठे, उपाध्यक्ष संतोष बाबर यांच्यासह राजेश सावंत, संतोष निंबाळकर, नंदकुमार कांबळे, विजय कांबळे, शरीफ शेख, बाजीराव लोखंडे, अविनाश ववले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाना शिवले यांनी केले.

### संस्थेशी असलेला स्नेह कायम...

» भरत जाधव म्हणाले की, २००७ मध्ये 'गलगले निघाले' या चित्रपटाच्या शूटींगच्या निमित्ताने पिंपरी-चिंचवड शहरात आलो होतो, तेव्हा संपूर्ण शहर फिरलो. अनेक चांगले मित्र जोडले गेले. 'गलगले'च्या शूटींगसाठी दिशा सोशल फाऊंडेशनच्या टीमने तसेच शहरवासियांनी भरपूर मदत केली, ती आम्ही कधीही विसरू शकत नाही. तेव्हापासून या संस्थेशी असलेला स्नेह इतक्या वर्षानंतरही कायम आहे, असे ते म्हणाले.

"२००२ मध्ये 'सही रे सही' सुरू करताना इतकी वर्षे हे नाटक रंगभूमीवर चालेल, असं कधीच वाटलं नव्हतं. पण प्रेक्षकांनी दिलेलं प्रेम, रंगभूमीचा मिळालेला आशिर्वाद, आणि आमच्या संपूर्ण टीमची मेहनत यामुळेच आज ४५०० वा प्रयोग साजरा करत आहोत. हे नाटक आता आमचं उरलेलं नाही, ते पूर्णपणे प्रेक्षकांचं झालं आहे. एकच कलाकार सलग २३ वर्षे एकाच नाटकात काम करत आहे आणि प्रेक्षकांचं न थांबणारं प्रेम मिळत आहे, ही माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे. पिंपरी-चिंचवडकरांच्या साक्षीने हा सोहळा साजरा करताना आम्हाला अभिमान वाटतो आहे. प्रेक्षकांच्या या निस्वार्थ प्रेमामुळेच 'पुन्हा सही रे सही' आता ५ हजार प्रयोगांच्या दिशेने वाटचाल करत आहे."

- भरत जाधव, अभिनेता.



# पुण्याच्या रेल्वे इतिहासात नवा टप्पा!

## हडपसर अन् खडकी टर्मिनलच्या रूपाने रेल्वेगाड्यांचे विकेंद्रीकरण

**पुणे | प्रतिनिधी**

तब्बल १६६ वर्षांनंतर पुण्यात रेल्वेसेवेचा सांधा बदलला जात आहे. पुणे स्थानकावरील रेल्वे गाड्यांचा ताण कमी करण्यासाठी हडपसर व खडकी टर्मिनल विकसित केले जात आहे. येत्या दोन ते तीन महिन्यांत दोन्ही स्थानके विकसित होतील. त्यामुळे पुण्याहून सुटणाऱ्या सुमारे २५ रेल्वेगाड्यांचे विकेंद्रीकरण होणार आहे. हडपसर व खडकी स्थानकावरून सुटणाऱ्या गाड्यांची संख्या वाढेल. परिणामी पुणे स्थानकावरील गाड्या व प्रवाशांची संख्या कमी होण्यास मदत होईल. २५ गाड्यांचे विकेंद्रीकरण झाल्यानंतर पुणे स्थानकावरील प्रवाशांची संख्या किमान ६२ हजारांनी कमी होण्याची शक्यता आहे.

देशात पहिली प्रवासी रेल्वे सेवा मुंबईत १६ एप्रिल १८५३ ला सुरू झाली. त्यानंतर मुंबई-पुणेदरम्यान लोहमार्गाचे काम सुरू झाले. १८५८ मध्ये पुणे स्थानकाची छोटी इमारत बांधण्यात आली. पुण्याहून पहिली प्रवासी रेल्वे १६ नोव्हेंबर १८५९ ला धावली. त्यानंतर रेल्वे गाड्यांनी पुणे स्थानकाचा ट्रॅक कधी सोडलाच नाही. कालौघात पुण्याहून धावणाऱ्या गाड्यांची संख्या वाढत गेली. स्थानकाच्या अपुऱ्या जागेमुळे विस्तारीकरणाला मर्यादा येऊ लागल्या. त्यात गाड्यांचा पर्यायाने प्रवाशांचा कोंडमारा होण्यास सुरुवात झाली. मात्र, गेल्या काही वर्षांत रेल्वे प्रशासनाने पुणे स्थानकाचे सॅटेलाइट स्टेशन म्हणून हडपसर व खडकी स्थानकाचा विकास करण्यावर भर दिला. देशात पुण्याचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन रेल्वे बोर्डानेही दोन्ही स्थानकांच्या विकासासाठी सुमारे १२५ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला. मागील दोन वर्षांपासून सुरू असलेले स्थानक विकासाचे काम अंतिम टप्प्यात आहे. येत्या दोन ते तीन महिन्यांत हडपसर व खडकी स्थानक पुण्यातील रेल्वेच्या इतिहासातील नवे मापदंड ठरतील यात शंका नाही.

रेल्वे हडपसर, खडकी स्थानकांवर या सुविधा मिळणार पादचारी पूल लिफ्ट, सरकता जिना क्लॉक रूम विश्रांती कक्ष उपाहारगृह सीसीटीव्ही कॅमेरे आरक्षण केंद्र, चालू तिकीट खिडकी पिण्याच्या पाण्याची सोय एटीव्हीम (स्वयंचलित तिकीट विक्री केंद्र) कोच डिस्प्ले पार्किंग पार्सल कार्यालय सामूहिक शयनयान कक्ष पुणे स्थानकावरचा ताण वाढल्याने त्याचा परिणाम प्रवासी सुविधेवर होत आहे. प्रवाशांची सोय व्हावी, रेल्वे गाड्यांच्या संचलनासाठी हडपसर व खडकी टर्मिनल विकसित केले जात आहे. दोन महिन्यांत स्थानके पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होतील. प्रवाशांना येथे चांगल्या दर्जाच्या सुविधा दिल्या आहेत.

- पद्मसिंह जाधव, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक, पुणे

### हडपसर टर्मिनल...

**» हडपसर स्थानकावर नवे टर्मिनलचे काम वेगात सुरू आहे. यासाठी सुमारे ९८ कोटींचा खर्च केला जात आहे. हडपसर स्थानकावर तीन फलाट आहेत. त्या ठिकाणी स्टेबलिंग लाइन नसल्याने गाडी ठेवण्याच्या अडचणी येत होत्या. आता रेल्वे प्रशासनाने दोन नवीन स्टेबलिंग लाइन केल्या आहेत. नुकत्याच झालेल्या मेगा ब्लॉकमध्ये स्टेबलिंग लाइन मुख्य मार्गिकेला जोडल्या आहेत. त्यामुळे हडपसर स्थानकावर रेल्वेगाडी उभी करण्यासाठी जागा उपलब्ध झाली आहे. तसेच, हडपसर स्थानकावरची सिग्नल यंत्रणाही आता आधुनिक झाली आहे. हे काम झाल्याने हडपसर स्थानकावरून नवीन रेल्वे गाड्या सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला.**

# सामान्य माणसाला फसवू नका!

## जिथे लढायचे तिथे लढायचे नाही, अशी या आघाडीची स्थिती : वंचित बहुजनचे नेते प्रकाश आंबेडकर

**पुणे | प्रतिनिधी**

वरातीमागे घोडं, अशी काँग्रेसची आणि राष्ट्रवादीची परिस्थिती आहे. ईव्हीएमसंदर्भात कोर्टात जाण्यासाठी आपण यापूर्वी सर्व पक्षांना एकत्र येण्याचे आवाहन केले होते. त्यावेळी कोणीही आमच्यासोबत आले नाही. न्यायालय हे एकमेव व्यासपीठ आहे, जिथे दूध का दूध आणि पाणी का पाणी होते. आता बोंबलत बसण्याऐवजी त्यावेळीच पाऊल उचलणे गरजेचे होते, असे वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर म्हणाले आहेत. सामान्य माणसाला फसवू नका. जिथे लढायचे तिथे लढायचे नाही, अशी या आघाडीची स्थिती आहे. पाकिस्तानला पाच तुकड्यांमध्ये विभागण्याची संधी असताना काँग्रेसने युद्ध थांबवले, आज तीच भूमिका काँग्रेसने घेतली, तुम्ही युद्ध का थांबवले ते सांगा, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.



राहुल गांधी विरोधी पक्ष नेते आहेत. त्यांच्याकडे कोण येतो, कोण जाते याची नोंद ठेवली जाते. माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार दोघांना घेऊन गेले, त्यांची एन्ट्री राहुल गांधींच्या घरी असणार आहे. शरद पवारांसोबत दोन माणसे कोण होती, त्यांची नावे जाहीर करू शकता, सामान्य माणसाला फसवू शकता. हा दावा मी खोटे म्हणणार नाही, अशी लोकं मार्केटमध्ये आहेत. मी २००४ पासून बोलतोय ईव्हीएम मेनूप्लेट होतेय, असेही आंबेडकर यांनी सांगितले.

**एक नागनाथ आहे आणि दुसरा साधनाग**

'केंद्रीय माजी कृषीमंत्री शरद पवार यांनी सुरू केलेल्या 'मंडल' यात्रेचा उद्देश ओबीसींचे कल्याण करणे नाही, तर यामागे राजकीय हेतू आहे,' असा आरोप करून प्रकाश आंबेडकर म्हणाले, विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना राष्ट्रवादी काँग्रेसने ओबीसींच्या शिष्यवृत्तीला विरोध केला होता. ओबीसी हा श्रीमंत मराठ्यांच्या विरोधात जातोय आणि श्रीमंत मराठा हा राष्ट्रवादी काँग्रेसचा आधार आहे. श्रीमंत मराठ्यांच्या विरोधात ओबीसी जाणार नाही, हाच या यात्रेमागचा राजकीय हेतू आहे. मागील निवडणुकांमध्ये ओबीसी भाजपकडे झुकला यात दुमत नाही, पण आता त्यांच्या लक्षात आले आहे की 'एक नागनाथ आहे आणि दुसरा साधनाग आहे,' अशी उपरोधिक टीका प्रकाश आंबेडकर यांनी केली.

### ...तर इंडिया आघाडीने न्यायालयीन लढाईत सोबत

» 'इलेक्शन कमिशन स्वतः मूर्ख आहे. काँग्रेस पक्षात एकमत दिसत नाही, वेगवेगळे गट एकमेकांवर कुरघोडी करत आहेत. निवडणूक आयोगाच्या विरोधात कोर्टात जाण्यासाठी आपण पत्र लिहिले होते. पण, त्यावेळी कोणीच सोबत उभा राहिला नाही. मुंबई उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली असली तरी आम्ही सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. तुमचा लढा खरा असेल आणि तुम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना घाबरत नसाल, तर तुम्ही यात सहभागी होऊ शकता,' असे आवाहन प्रकाश आंबेडकरांनी इंडिया आघाडीला केले.

> शरद पवारांनी सुरू केलेली 'मंडल यात्रा' ही ओबीसींच्या कल्याणासाठी नाही, तर एक राजकीय खेळी आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचा आधार श्रीमंत मराठा समाज आहे, आणि म्हणूनच त्यांनी पूर्वी ओबीसी शिष्यवृत्तींनाही विरोध केला होता. आज ओबीसी भाजपकडून परत येतोय, पण त्यांच्या समोर आता दोनच पर्याय आहेत — एक नागनाथ आणि दुसरा साधनाग.
> – प्रकाश आंबेडकर.

# चाकणमध्ये सलग पाच दिवस पाणीपुरवठा विस्कळीत!

## नागरिकांचे हाल : टँकरवाल्यांची चांदी, प्रशासनाच्या कारभारावर नागरिकांची टीका

**पुणे | प्रतिनिधी**

विजेच्या अतिरिक्त दाबाने शहराला पुरवठा करणाऱ्या पाणी उपसा पंपाचे नुकसान झाल्याने चाकण शहराचा मागील पाच दिवसांपासून पाणीपुरवठा बंद झाला आहे. लोकांना पिण्यासह वापराचे पाणी नसल्याने टँकर आणि बाटली बंद पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. ऐन पावसाळ्यात पाणीपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांनी पालिकेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

चाकण शहराला पाणीपुरवठा जुन्या योजनेवरून केला जातो आहे. दररोज सात ते साठ लाख लिटर पाणीपुरवठा नागरिकांना केला जातो. परंतु हा पाणीपुरवठा खूप अपुरा आहे. अगदी दोन-तीन लाखांवर शहराची लोकवस्ती वाढलेली आहे. या वाढलेल्या लोकसंख्येला पालिकेलासुद्धा पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे जिकरीचे ठरत आहे. पाणीपुरवठा करणाऱ्या पंपाचा वीजपुरवठा खंडित झाल्यास किंवा पाइपलाइनचे फुटतुट झाल्यास संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होतो आहे.

मागील पाच दिवसांपूर्वी विजेचा अतिरिक्त दाब वाढल्याने पाणीपुरवठा पंप जळाला. स्पेअरला ठेवलेल्या पाणी पंपाचेही नुकसान झाल्याने शहराचा पाणीपुरवठा कोलमडून पडला. याचा फटका शहरातील नागरिकांना सहन करावा लागतो आहे. नगरपरिषदकडे पर्यायी व्यवस्था नसल्याने ऐन पावसाळ्यात लोकांना वापराचे आणि पिण्याचे पाण्यासाठी टँकर आणि बाटली बंद पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे.



> सध्या एक दिवसाआड शहराला पाणीपुरवठा केला जातो आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यावर किंवा पाइपलाइनचे नुकसान झाल्यास शहरातील पाणीपुरवठ्यावर परिणाम होतो. शहराची लोकसंख्या वाढल्याने याचा परिणाम जुन्या पाणीपुरवठा योजनेवर होतो आहे. भामा आसखेडवरील पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्यावर पाणीपुरवठा सुरळीत होणार आहे.
> - डॉ. अंकुश जाधव, मुख्याधिकारी.